दि. २९ जानेवारी २०२६
गुरुवार
वर्ष ४ थे
अंक ८८
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

# दैनिक अदिती एक्सप्रेस

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे ईमेल-aditiexpress33@gmail.com, Website: www.aditiexpress.in

## आजचे पंचाग

- दिनांक : २९ जानेवारी २०२६
- वार : गुरुवार
- माह (अमावस्यांत) : माघ
- माह (पूर्णिमांत) : माघ
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : शुक्ल पक्ष
- तिथी : सप्तमी तिथी (रात्री ११:१० पर्यंत) त्यानंतर अष्टमी तिथी
- नक्षत्र : रेवती नक्षत्र (दुपारी ०१:३५ पर्यंत) त्यानंतर अश्विनी नक्षत्र
- योग : सिद्ध योग (सकाळी ११:४५ पर्यंत) त्यानंतर साध्य योग
- करण : गराजा करण (सकाळी ११:५७ पर्यंत) त्यानंतर वाणीजा करण
- चंद्र राशी : मीन राशी (दुपारी ०१:३५ पर्यंत) त्यानंतर मेष राशी
- सूर्य राशी : मकर राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : संध्याकाळी ०५:०२ ते संध्याकाळी ०६:२६ पर्यंत
- शुभ मुहूर्त:
- अभिजित : दुपारी १२:२९ ते दुपारी ०१:१३
- सूर्योदय : सकाळी ०७:१६
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:२६
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

## हवाई दलाने घेतला बारामती विमानतळाचा ताबा

पुणे: उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर गुरुवारी बारामतीत होणाऱ्या अंत्यसंस्कारासाठी देशभरातील अतिमहत्त्वाच्या व्यक्ती येणार आहेत. ही गंभीर परिस्थिती आणि हवाई सुरक्षेची गरज ओळखून महाराष्ट्र सरकारच्या तातडीच्या विनंतीनंतर भारतीय वायुसेनेने बारामती विमानतळाचा ताबा घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि इतर अनेक मुख्यमंत्री विमानाने किंवा हेलिकॉप्टरने बारामतीत येणार आहेत. त्यांच्या सुरक्षित लँडिंगची जबाबदारी आता पूर्णपणे वायुसेनेकडे असणार आहे.

पुण्यातील लोहेगाव वायुसेना तळावरून हवाई वाहतूक नियंत्रण तज्ज्ञांचे एक विशेष पथक तातडीने बारामतीकडे रवाना झाले आहे. या पथकाने आपल्यासोबत अत्यावश्यक तांत्रिक उपकरणे आणि संवाद यंत्रणा आणली असून, बारामती विमानतळावर 'इमर्जन्सी एअर ट्रॅफिक कंट्रोल' सेवा सुरू केली आहे. बारामतीमध्ये कायम स्वरूपी रडार किंवा आधुनिक एटीसी नसल्याने, वायुसेनेने आपली (पान ३ वर)

# भल्या पहाटे कामाचा उदय करणाऱ्या नेत्याचा पहाटे अंत



बारामती : महाराष्ट्रासाठी आजची सकाळ अतिशय धक्कादायक ठरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. बारामतीतत लँडिंगदरम्यान अजित पवार यांचे विमान कोसळले आणि त्याला भीषण आग लागली. या दुर्दैवी अपघातात अजित पवार यांच्यासह ६ जणांचा मृत्यू झाला आहे. अपघात इतका भयानक होता की विमान पूर्णपणे उद्धवस्त झाले आणि हवेत धुराचे लोट पसरले. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे.

**महाराष्ट्राच्या राजकारणातला ताकदवान चेहरा**

२२ जुलै १९५९ साली जन्मलेले अजित पवार यांचा राजकारणात मोठा दबदबा होता. १९८२ साली त्यांनी स्थानिक राजकारणात प्रवेश केला. अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक असे नाव होते ज्यांनी अनेक दशके सत्ता आणि संघटना दोन्हीवर मजबूत पकड राखली. अजित पवार यांनी १९८२ मध्ये राजकारणात प्रवेश केला आणि महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात लवकरच स्वत:चे स्थान निर्माण केले. त्यांचे काका शरद पवार यांच्यासोबत त्यांनी काँग्रेस पक्ष आणि नंतर फुटलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मजबूत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

**७ वेळा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ**

भल्या पहाटे उठून काम करणा-या नेत्यांमध्ये अजित पवार यांचे हमखास नाव घेतले जायचे. ७ वेळा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याचा रेकॉर्ड त्यांच्या नावे होता. प्रशासनावर असलेला त्यांचा वचक आणि राजकारणतला त्यांचा दबदबा सर्वश्रुत होता.

शरद पवार यांच्या सरकारमध्ये

**मिळाली मोठी जबाबदारी**

१९९३ साली शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तेव्हा अजित पवार यांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळाले. त्यानंतरही ते सरकार आणि संघटनेत महत्त्वाच्या भूमिका बजावत राहिले. २०१० मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस युती सरकारमध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्ती झाल्यानंतर अजित पवार यांचा राजकीय लौकिक आणखी वाढला. या काळात ते राज्याच्या राजकारणातील सर्वात प्रभावशाली नेत्यांपैकी एक बनले. राजकारणाव्यतिरिक्त, अजित पवार यांचा सहकार क्षेत्रातही मोठा प्रभाव होता. ते महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांशी (पान ३ वर)

# शासकीय इतमामात अंत्यसंस्काराची तयारी



मुंबई- महाराष्ट्राच्या राजकारणातील एका युगाचा दुःखद अंत झाला आहे. उपमुख्यमंत्री आणि ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या निधनाने राज्याला धक्का बसला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीन दिवसांचा राजकीय दुखवटा जाहीर केला आहे. उद्या सकाळी ११ वाजता बारामती येथील त्यांच्या वडिलोपार्जित घरी पूर्ण राजकीय सन्मानाने अंत्यसंस्कार केले जातील.

अजित पवार यांच्या निधनाची बातमी मिळताच संपूर्ण महाराष्ट्रात शोकाचे वातावरण पसरले. रुग्णालयाबाहेर कुटुंबातील सदस्य आणि समर्थकांची मोठी गर्दी जमली होती. अजितदादांचे कार्यस्थळ असलेल्या बारामतीमध्ये कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. बारामती जिल्हा रुग्णालयातून अजित पवार यांचे पार्थिव विद्या प्रतिष्ठान येथील मैदानाकडे नेले जात आहे. विद्या प्रतिष्ठान येथे त्यांचे पार्थिंव अत्यंदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. ॲब्युलन्समध्ये अजित पवार यांचे चिरंजीव जय पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे काही नेतेमंडळीही आहेत. ॲब्युलन्सच्या चारही बाजूला अजित पवार यांचे कार्यकर्ते जमले असून ङ्गअजित दादा परत याङ्ग अशी घोषणाबाजी करताना दिसत आहेत.

कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, अजित पवारांच्या पार्थिवावर बारामतीतील त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार होणार आहेत. आज बुधवारी संध्याकाळपासून त्यांचे पार्थिव विद्या नगरी चौकातील विद्या प्रतिष्ठान येथे अंतिम दर्शनासाठी ठेवले जाईल. आज रात्री उशिरापर्यंत नागरिकांना त्यांचे अंत्यदर्शन घेता येणार आहेत. उद्या सकाळी ९ वाजता गदिमा सभागृहापासून त्यांच्या अंत्ययात्रेला सुरुवात होईल. विद्या प्रतिष्ठान चौकापासून भिगवण रोड सेवा रस्त्यावरून ही अंत्ययात्रा निघेल. त्यानंतर सकाळी ११ च्या दरम्यान विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले जातील.

अजित पवारांच्या अंत्यसंस्कारासाठी बारामतीतील दोन वेगवेगळ्या ठिकाणी प्रशासकीय आणि कौटुंबिक पातळीवर तयारी सुरू आहे. एकीकडे बारामतीतील विद्या प्रतिष्ठाच्या मैदानात तयारी सुरू आहे. तर दुसरीकडे पवार कुटुंबियांचे मुळ गाव असलेल्या काटेवाडीतही वेगाने घडामोडी सुरू आहेत. काडेवाडीतील त्यांच्या मुळ निवासस्थानाशेजारी असलेल्या गावातही मोठी तयारी सुरू आहेत, घराशेजारील संपूर्ण शेतजमीन नांगरून सपाट करण्यात आली आहे.

बारामतीतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसरात अजित पवारांच्या समर्थक, चाहते आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी जमली आहे. त्यांच्या कार्यकर्त्यांना अश्रू अनावर होत आहेत. (पान ३ वर)

# महाराष्ट्र शोकसागरात बुडाला असताना ममतांनी सुरू केले राजकारण पवारांनी सुनावले



पुणे : तब्बल सहा वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रिपद भूषवणाऱ्या अजित पवारांचे बुधवारी सकाळी बारामती विमानतळाजवळ विमान अपघातात निधन झाले. या निधनावर प्रतिक्रिया देताना पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सखोल चौकशीची मागणी केली आणि अपघात की घातपात असा संशय व्यक्त केला. अखेर ज्येष्ठ नेते आणि राज्यसभा खासदार शरद पवार यांनी प्रसारमाध्यमांसमोर येऊन महत्त्वाची माहिती दिली. त्यांनी अजित पवारांच्या मृत्यूवरून राजकारण करणाऱ्यांना सुनावले.

अजित पवारांचा मृत्यू झाल्यामुळे प्रचंड दुःख झाले आहे. हा मोठा धक्का आहे. यातून सावरण्यास वेळ मिळावा म्हणून प्रसारमाध्यमांसमोर येणार नव्हतो. पण अजित पवारांच्या मृत्यूवरून राजकारण सुरू झाल्यामुळे प्रसारमाध्यमांसमोर येऊन प्रतिक्रिया देत असल्याचे शरद पवारांनी सांगितले. जनमानसात चांगली प्रतिमा असलेल्या अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला आहे. हा घातपात नाही, अपघात आहे; असे शरद पवार म्हणाले. अजित पवारांच्या मृत्यूवरून कोणीही राजकारण करू नये, असेही शरद पवार म्हणाले.

अजित पवार यांचा अपघाती मृत्यू हा महाराष्ट्राला प्रचंड मोठा धक्का आहे. एक कर्तृत्ववान आणि निर्णय घेण्याची शक्ती ज्यांच्यात आहे, अशा व्यक्तीला महाराष्ट्र आज मुकला आहे. जे काही नुकसान झालंय ते भरून निघणारं नाही, पण सगळ्याच गोष्टी काही आपल्या हातात नसतात. मी प्रसारमाध्यमांसमोर येणार नव्हतो.पण काही माध्यमांमध्ये या अपघातामागे काही राजकारण आहे अशा प्रकारची भूमिका (पान ३ वर)

# अजित पवारांच्या विमानातील 'ती' क्रू-मेंबर; बाबा, दादांशी तुमचं बोलणं करून देईन.. पिंकीचा तो शब्द शेवटचाच ठरला!

बारामती : संपूर्ण महाराष्ट्र आज एका अत्यंत दुर्दैवी आणि सुन्न करणाऱ्या बातमीने जागा झाला. बारामतीमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला झालेल्या भीषण अपघातात, अजित पवारांसह विमानातील पाच जणांचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. राजकारणातील एक 'व्हिजनरी' आणि स्पष्टवक्ता नेता हरपल्याने संपूर्ण राज्य शोकसागरात बुडाले आहे. या भीषण अपघातात अजित दादांसोबतच त्यांचे



अंगरक्षक विदीप जाधव, दोन अनुभवी पायलट आणि एका महिला क्रू मेंबरचा समावेश होता. या दुर्घटनेत मृत्यू झालेली तरुण क्रू मेंबर पिंकी माळी हिच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. पिंकीच्या कुटुंबीयांनी अत्यंत जड अंतःकरणाने आपल्या लाडक्या लेकीच्या शेवटच्या आठवणींना उजाळा दिला. एका उमद्या नेतृत्वाच्या आणि तरुण जीवांच्या अशा अचानक जाण्याने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

**वडिलांशी बोलणं करून देण्याचं स्वप्न अधुरंच**

बारामती येथील विमान (पान ३ वर)

# पार्थिव पुन्हा रुग्णालयात नेताना जय पवारांना अश्रू अनावर!



बारामती : बारामतीजवळ झालेल्या अत्यंत दुर्दैवी विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचे निधन झाल्याच्या वृत्ताने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या भीषण दुर्घटनेत दादांचे वैयक्तिक सहाय्यक, सुरक्षा रक्षक आणि वैमानिकांनीही आपले प्राण गमावले आहेत. या बातमीमुळे राज्याच्या राजकीय पटलावर कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली असून संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. अजित दादांच्या निधनाची बातमी समजताच त्यांच्या चाहत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा जनसागर बारामतीकडे झेपावला. शहराकडे येणारे सर्व रस्ते नागरिकांच्या गर्दीने अक्षरशः फुलून गेले होते. प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू आणि लाडक्या नेत्याला शेवटचे पाहण्याची ओढ दिसून येत होती. आज सायंकाळी उशिरा अजित दादांचे पार्थिव रुग्णालयातून विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अंतिम दर्शनासाठी आणण्यात आले. यावेळी पवार कुटुंबातील सदस्यांसह राज्यभरातील विविध पक्षांचे नेते आणि हजारो कार्यकर्त्यांनी दादांना साश्रू नयनांनी श्रद्धांजली वाहिली. अंत्यदर्शनाचा हा सोहळा अत्यंत हृदयद्रावक होता. दर्शनानंतर पार्थिव पुन्हा एकदा रुग्णालय परिसरात नेण्यात आले असून, उद्या सकाळी त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार पार पडणार आहेत.

(पान ३ वर)

# अजित पवारांच्या निधनावर राजकीय क्षेत्रातल्या मान्यवरांच्या प्रतिक्रिया

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला आज बुधवार २८ जानेवारी रोजी बारामती येथे मोठा अपघात झाला. या अपघातात अजित पवार यांचा मृत्यू झाला असून अजून सहा जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघाती निधनावर राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.

**– द्रौपदी मुर्मु, राष्ट्रपती**

बारामती येथे झालेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. अजित पवार यांचे अकाली निधन ही एक अपरिमित हानी आहे. महाराष्ट्राच्या विकासात, विशेषतः सहकार क्षेत्रातील त्यांच्या विशेष योगदानासाठी ते सदैव स्मरणात राहतील. मी त्यांचे कुटुंब, समर्थक आणि चाहत्यांप्रती शोकसंवेदना व्यक्त करते. ईश्वर या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या इतर सर्व व्यक्तींच्या कुटुंबांनाही हा आघात सहन करण्याची शक्ती देवो.

२) पंतप्रधान नरेंद्र मोदी

अजित पवार हे जनतेशी घट्ट नाते असलेले, तळागाळाशी मजबूत नाळ असलेले लोकनेते होते. महाराष्ट्रातील जनतेच्या सेवेत सदैव अग्रभागी राहणारे एक मेहनती व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना व्यापक आदर होता. प्रशासकीय बाबींची त्यांना सखोल जाण होती. गरीब आणि वंचितांच्या सक्षमीकरणासाठीची त्यांची तळमळ विशेष उल्लेखनीय होती. त्यांचे अकाली निधन अत्यंत धक्कादायक व दुःखद आहे. त्यांच्या कुटुंबीयांप्रती आणि असंख्य चाहत्यांप्रती मनःपूर्वक शोकसंवेदना. ॐ शांती.

अमित शहा आज एका अत्यंत दुःखद अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि आमचे एनडीएचे ज्येष्ठ सहकारी अजित पवार यांना गमावल्याची बातमी ऐकून मन अत्यंत व्यथित झाले आहे. अजित पवार यांनी गेली साडेतीन दशके ज्या प्रकारे महाराष्ट्रातील प्रत्येक वर्गाच्या कल्याणासाठी स्वतःला समर्पित केले, ते शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. जेव्हा जेव्हा त्यांची भेट व्हायची, तेव्हा ते महाराष्ट्राच्या जनतेच्या हिताच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करायचे. त्यांचे निधन ही एनडीए कुटुंबासह माझी देखील वैयक्तिक हानी आहे. मी पवार परिवाराप्रती माझ्या संवेदना व्यक्त करतो. दुःखाच्या या प्रसंगी संपूर्ण एनडीए शोकाकुल पवार परिवारासोबत खंबीरपणे उभा आहे. ईश्वर दिवंगत आत्म्यास आपल्या चरणी स्थान देवो. ॐ शांती शांती शांतीङ्ग

४) राहुल गांधी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आज विमान अपघातात निधन झाल्याचे वृत्त अत्यंत वेदनादायक आहे. या कठीण प्रसंगी मी महाराष्ट्राच्या जनतेच्या दुःखात सहभागी आहे. संपूर्ण पवार कुटुंब आणि त्यांच्या प्रियजनांप्रती मी या शोकप्रसंगी आपल्या संवेदना व्यक्त करतो.

**देवेंद्र फडणवीस**

अजित पवार महाराष्ट्रातले लोकनेते होते आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेला, महाराष्ट्राच्या प्रश्नांची जाण असलेला अशा प्रकारचा हा नेता होता. अजित पवार यांच्याबद्दल जनसामान्यांमध्ये मोठी आस्था होती. अजित पवार हे संघर्ष करणारे नेते होते. कुठल्याही परिस्थितीत न डगमगता पुढे जाणारं व्यक्तिमत्व होतं. आजचा दिवस महाराष्ट्रासाठी कठीण दिवस आहे. अशा प्रकारचं नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्षे लागतात. महाराष्ट्राच्या विकासात महत्त्वाचं योगदान ते देत होते, त्याचवेळी त्यांचं निधन झालं ही बाब अविश्वसनीय आहे. माझ्यासाठी वैयक्तिक नुकसान झालं आहे. दमदार आणि दिलदार मित्र निघून गेला आहे. पवार कुटुंबावरही हा मोठा आघात



आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांनाही मी घडलेल्या परिस्थितीची कल्पना दिली आहे. या घटनेबाबत त्यांनीही प्रचंड दुःख व्यक्त केलं आहे. संपूर्ण घटनेमुळे राज्यात हळहळ पसरली आहे. कुटुंबाकडून पुढील गोष्टी ठरवण्यात येणार आहेत. सुप्रिया सुळे आणि पार्थ पवार यांच्याशी माझं बोलणं झालं आहे. महाराष्ट्रात आज शासकीय सुटी घोषित केली आहे. तसंच तीन दिवसांचा दुखवटाही जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्रातून असे लोकनेते गेल्यावर जी पोकळी निर्माण होते ती भरुन काढणं कठीण असतं. इतक्या जवळून, इतक्या संघर्षाच्या काळात आम्ही एकत्र काम केलं आहे. अजित पवार नाहीत या गोष्टीवर विश्वास ठेवायलाच मन तयार होत नाही अशी स्थिती आहे.

**– नारायण राणे**

माझे सहकारी मित्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाची बातमी मन सुन्न करून टाकणारी आहे. राजकारणाच्या प्रदीर्घ वाटचालीत अनेक संघर्ष, मतभेद आणि प्रसंग आले, पण त्या सर्वांच्या पलीकडे जाऊन अजितदादा हे एक निर्भीड, ठाम निर्णय घेणारे आणि कार्यक्षम नेतृत्वाचे प्रतीक होते. सत्तेच्या केंद्रस्थानी असतानाही सामान्य माणसाच्या वेदनांशी नातं जपणारा, परिस्थिती कितीही कठीण असली तरी मागे न हटणारा असा खंबीर कणखर नेता महाराष्ट्राने आज गमावला आहे. त्यांची कार्यशैली, स्पष्ट भूमिका आणि जबाबदारीची जाणीव ही पुढील पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील. शब्दांपेक्षा कृतीवर विश्वास ठेवणारा, जबाबदारीला कधीच पाठ न फिरवणारा आणि जनतेच्या प्रश्नांसाठी कायम सज्ज असणारा असा अजितदादांचा स्वभाव होता. त्यांच्या जाण्याने राज्याच्या सार्वजनिक जीवनात एक खोल व वेदनादायक पोकळी निर्माण झाली आहे. या दुःखद क्षणी त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात मी सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हीच प्रार्थना.

**–एकनाथ शिंदे**

आज माझा मोठा भाऊ हरपल्यासारखी भावना आहे. अजित पवार हे केवळ नेते नव्हते, तर ते एक अभ्यासू, वेळेचं भान ठेवणारे आणि प्रशासनावर मजबूत पकड असलेले व्यक्तिमत्त्व होते. आम्ही अनेक वर्षे एकत्र काम केलं. अजित पवार पहाटेपासून कामाला लागायचे. सकाळी सहा वाजताही त्यांनी आदेश दिल्याचे मी स्वतः पाहिले आहेत. प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करूनच ते बोलायचे. रोखठोक स्वभाव असला, तरी मनाने ते अत्यंत निमळ होते. मंत्रिमंडळात जेव्हा राज्याच्या आर्थिक स्थितीबाबत चर्चा व्हायची, तेव्हा अजित पवार नेहमीच वास्तव मांडायचे आणि योग्य दिशा सुचवायचे. त्यांचा अनुभव, अभ्यास आणि प्रशासनावरील पकड आम्हा सर्वांसाठी मार्गदर्शक ठरायची. आज त्यांच्या जाण्याने पवार कुटुंबाचंच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राचं मोठं नुकसान झालं आहे. मी त्यांना मनापासून आदरांजली अर्पण करतो. अजित पवार यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक निर्भीड, धडाडीचा आणि अनुभवी नेता गमावला असून, त्यांच्या कार्याची आठवण कायम जनतेच्या मनात राहील.

**नितेश राणे**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत धक्कादायक आणि दुःखद आहे. त्यांच्या निधनाने जवळपास चारहून अधिक दशके महाराष्ट्राच्या समाजकारणात सेवा देणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व हरपले. प्रशासनावर असलेली त्यांची पकड, सहकार क्षेत्राची जाण, निर्णयक्षमता आणि कामातील शिस्त तसेच जनसामान्यांसाठी अखंड झटण्याची वृत्ती यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण केले होते. राज्याच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले निर्णय, दाखवलेली कार्यतत्परता आणि जबाबदारीची जाणीव असंख्य कार्यकर्त्यांसाठी पथदर्शी ठरेल. त्यांचे विचार, कार्य आणि नेतृत्वाचा ठसा हा महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक इतिहासावर कायमस्वरूपी कोरला गेलेला आहे. अजितदादा पवार यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली! त्यांच्या आत्म्यास शांती लाभो तसेच या दुःखातून सावरण्याचे (पान ३ वर)

# घातक पाणी

इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २७ जणांचा मृत्यू झाला आहे. जलवाहिन्यांमार्फत दूषित पाण्याचा पुरवठा आणि त्यामुळे महू येथील काविळीची साथ याचा फटका नागरिकांना बसत आहे. इंदूरनंतर महूतील घटना, प्रशासन यंत्रणा किती बेपर्वाईपणाची आहे आणि किती नागरिकांच्या आरोग्याशी खेळते आहे हे सिद्ध होते.

मध्य प्रदेशातील इंदूर शहरातील जलसंकट आणि दूषित पाण्याची चर्चा सध्या देशभर आहे. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २७ जणांचा मृत्यू झाला आहे. जलजन्य आजारांमुळे अनेक रुग्ण विशेषतः लहान मुले रुग्णालयात दाखल आहेत. ज्या शहराला स्वच्छतेबद्दल सातत्याने पुरस्कार मिळत आले आहेत, त्या राज्यातील लहान मुले दूषित पाण्यामुळे आजारग्रस्त आहेत, हे विदारक सत्य पाहायला मिळत आहे. महूमध्ये २२ जणांमध्ये काविळीची लक्षणे आढळून आली. वास्तविक कावीळ हा काही असाध्य आजार नाही. पण इंदूरच्या जलवाहिन्यांमध्ये असलेल्या प्रदूषणामुळे भयानक रोगाने पुन्हा डोकेवर काढले आहे. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे काहीजण मृत्यूमुखी पडल्यावर महूतील घटना इंदूरची प्रशासन यंत्रणा किती बेपर्वाईपणाची आहे आणि किती नागरिकांच्या आरोग्याशी खेळते आहे हे सिद्ध होते.

महु येथे तर एक विहीर दूषित पाण्याने भरलेली आढळली. २४ हून अधिक नागरिक येथे आजारी पडले आणि आता या भागातील प्रशासनाने खबरदारीचे उपाय हाती घेतले आहेत. इंदूरच्या घटनेनंतर महु येथील घटना प्रशासनाला खडबडून जाग आणणारी ठरली आहे. पण यामुळे नागरिकांना पुरेसे स्वच्छ पाणी आणि पिण्यासाठी चांगले पाणी मिळेल का असा प्रश्न उभा राहिला आहे. इंदूर की महू असो की भारतातील कोणतेही लहान तालुकास्तरीय गाव असो, येथील नागरिकांना एका व्यापक सत्याला सामोरे जावे लागत आहे. ते म्हणजे स्वच्छ पाण्यापर्यंत पोहोच आणि सुरक्षा हे एकमेकांना पूरक असले पाहिजेत. पण, नेमके तेच त्यांना मिळत नाही. केवळ नागरिकांना पाणी देण्यामुळे आरोग्यावर झालेले परिणाम सुधारणार नाहीत तर त्यासाठी स्वच्छ पाणी मिळणे तितकेच गरजेचे आहे. भारतात जे जलजन्य आजारांच्या साथी येत आहेत. त्यांना दुर्दैवी परंतु पृथक स्थानिक स्वराज्य संस्थांची ढिलाई म्हणून पाहिले जाते. स्थानिक अधिकाऱ्यांचे हे अपयश तर आहेच पण जुनाट पाइपलाइन आणि क्वचित गंजलेल्या पाइपमधून पाणीपुरवठा होत राहणे हेही या साथींचे कारण आहेच. भागीरथपुरा येथील दुर्घटना हे दर्शवते, की हा एक अपघात नव्हता तर संभाव्य दृश्य परिणाम होता ज्यात सरकारी कारभाराचे मॉडेल ज्यात केवळ दिखाऊ स्वच्छता आणि आकडेवारीने मूलभूत सार्वजनिक आरोग्य आणि लोकांना स्वच्छ पेयजल देण्याचे वचन पाळले गेले नाही. इंदूर शहरातील शोकांतिकेने एक प्रश्न निर्माण केला आहे तो म्हणजे नळातून जर सांडपाणी येत असेल तर शहराच्या स्वच्छतेला काय अर्थ?.

सरकारने टाकलेल्या जलवाहिन्यांमार्फत दूषित पाण्याचा पुरवठा आणि त्यामुळे महू येथील काविळीची साथ याचा फटका नागरिकांना बसत आहे. तसेच इंदूरमध्ये अतिसाराची साथ आली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला आहे. याचा अर्थ सरळ आहे. नगरपालिका प्रशासनाने यात कुचराई केली आहे. जलवाहिन्या गंजलेल्या आहेत आणि भगीरथपुरा येथील एक जलवाहिनी तर स्वच्छतागृहाच्या खाली दबलेली होती. महूमध्ये पट्टी बाजार आणि चंदन नगर येथे गळक्या पाइपलाइनमुळे काविळीची साथ पसरली, महुमध्ये पाणीपुरवठा आणि स्वच्छतेची जबाबदारी कटक मंडळ (कॅन्टोनमेंट बोर्ड)ची आहे. रहिवाशांना उकळून पाणी पिण्याचा सल्ला देण्यात आला. पण 'बैल गेला आणि झोपा केला' अशी ही स्थिती आहे.

कॅगने २०१९ च्या अहवालात ८.९५ लाख रहिवाशांना दूषित पाण्याचा पुरवठा केल्याचा ठपका ठेवला होता. तसेच पाण्याच्या नमुन्यांचे सर्वेक्षण न केल्याचा आरोपही करण्यात आला होता. हे म्हणजे नागरिकांच्या आरोग्याशी अक्षम्य छेडछाड आहे असे नमूद करावे लागेल आणि त्याबाबत कुणालाही खंत नाही किंवा खेदही नाही ही बाब जास्त दुःखदायक आहे. अधिकाऱ्यांनी पाण्यामुळे होणाऱ्या आजाराची ५.४५ लाख प्रकरणे नोंदवली. पण त्यातही गंभीर बाब अशी की कॅगने आपल्या अहवालात पाण्याच्या चाचण्यांचा अभाव नोंदला आहे. त्यामुळे इंदूर किंवा महू किंवा मध्य प्रदेशात कुठेच पाणी दूषित आहे की नाही याची काहीच खातरजमा करता येत नाही.

आता हा दूषित पाण्याचा पुरवठा हा निश्र्चितच मध्यप्रदेशातील राजकीय पक्षांसाठी वादाचा मुद्दा बनला आहे. या मुद्यामुळे व्यापक पाण्याचा पेच तर ऐरणीवर आला आहेच पण काँग्रेस आणि भाजप यांच्यात जोरदार वाद रंगला आहे. काँग्रेसने या मुद्यावर व्यापक जनमोर्चे आयोजित केले तर भाजपने त्याला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. वास्तव हे आहे की पाणी हा राजकीय मुद्दा आहेच. कारण पाण्यावरून लढाया होतील असे भाकीत वर्तवले होते.

कोणतेही सरकार मग ते कोणत्याही पक्षाचे असो, ते इतक्या अफाट लोकसंख्येला पुरेसे आणि स्वच्छ पाणी पुरवू शकत नाही. पण याचा अर्थ असा नव्हे की इंदूर नगरपालिकेने केले ते योग्य केले. पण सरकारची क्षमता इतक्या लोकसंख्येला सुरक्षित पाणी पुरवण्याची नाही. यात राजकारण आणणे चुकीचे नव्हे तर निषेधार्ह आहे. मध्यप्रदेशात जे घडले किंवा घडत आहे ते सार्वत्रिक दृश्य आहे. त्यात नगरपालिका स्वच्छ पाण्याचा पुरवठा करत नसतील आणि त्यात काही अडचणी असतील तर त्यांना ती नगरपालिका जबाबदार आहे.

पान १ वरून

**भल्या पहाटे ...**

संबंधित होते आणि पुणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. ते महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांशी संबंधित होते आणि पुणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

जुलै २०२३ पुन्हा सांभाळली

उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी

अजित पवार यांनी जुलै २०२३ पासून पुन्हा एकदा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. या भूमिकेत त्यांनी पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात आपले निर्णायक अस्तित्व प्रस्थापित केले. गेल्या चार दशकांहून अधिक काळ राजकीय अनुभव असलेले अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणाचे एक कुशल रणनीतीकार आणि मजबूत प्रशासक मानले जात होते.

### शासकीय...

अजित दादा परत या, अजित दादा अमर रहे या घोषणांमधून त्यांचे कार्यकर्ते भावना व्यक्त करत आहेत. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी संपूर्ण बारामती शहरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूचा परिणाम पुणे जिल्ह्यासह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातही दिसत आहे.

### महाराष्ट्र शोकसागरात...

कलकत्त्यावरून मांडली गेली असं कळलं. पण यात राजकारण नाही, हा निव्वळ अपघात आहे. अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूच्या यातना महाराष्ट्राला आणि आम्हा सगळ्यांना आहेत. कृपया यात राजकारण आणू नये, एवढंच सांगायचं आहे; असे शरद पवार म्हणाले.

बारामतीत झालेल्या विमान अपघातात अजित पवारांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला. यात अजित पवारांसह मुंबई पीएसओ कउ विदीप जाधव, पायलट कॅप्टन सुमित कपूर, कॅप्टन शांभवी पाठक, फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांचा समावेश आहे. मुंबईतून निघालेले विमान बारामतीत आले आणि लँडिंग करत असतानाच या विमानाचा अपघात झाला. विमानात असलेल्या अजित पवारांसह एकूण पाच जणांचा अपघाती मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच राज्यात तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर करण्यात आला. या तीन दिवसांच्या कालावधीत महाराष्ट्रातील ज्या इमारतींवर नियमितपणे राष्ट्रध्वज फडकविण्यात येतो, त्या सर्व ठिकाणी राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येईल. तसेच या कालावधीत कोणतेही शासकीय मनोरंजन कार्यक्रम होणार नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनामुळे बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी राज्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालये बंद ठेवण्यात आली.

### हवाई दलाने...

फिरती यंत्रणा बसवून विमानांच्या येण्या-जाण्यावर नियंत्रण स्थापित केले आहे. विमान आणि जमिनीवरील नियंत्रण कक्ष यांच्यात थेट संपर्क प्रस्थापित करण्यासाठी विशेष वारंवारतेची उपकरणे कार्यान्वित केली आहेत.

स्थानिक प्रशासनाशी समन्वय

वायुसेनेचे हे पथक स्थानिक प्रशासन आणि नागरी हवाई उड्डाण विभागाच्या समन्वयाने काम करत आहे. बारामती विमानतळाचा परिसर आता एका लष्करी तळाप्रमाणे सुरक्षित करण्यात आला असून, प्रत्येक हालचालीवर वायुसेनेचे बारीक लक्ष आहे.

### अजित पवारांच्या...

अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये वरळीतील बी.डी.डी. चाळीतील एका उमद्या तरुणीचाही समावेश आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानात फ्लाईट अटेंडन्ट म्हणून कार्यरत असलेल्या कर्तु शिवकुमार माळी (पिंकी) या तरुणीचा या दुर्घटनेत दुर्दैवी अंत झाला. या बातमीने संपूर्ण वरळी परिसरावर शोककळा पसरली आहे. पिंकी दररोज आपल्या कुटुंबाशी न चुकता संवाद साधत असे. मात्र, आज जेव्हा तिच्या फोनवरून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही, तेव्हाच माळी कुटुंबाच्या मनात पाल चुकचुकली होती. दुर्दैवाने, त्यांची ही भीती काही वेळातच सत्यात उतरली. पिंकीचे वडील शिवकुमार माळी हे स्वतः राष्ट्रवादी काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत. काही दिवसांपूर्वीच पिंकी वडिलांचे बोलणे अजित पवारांशी करून देणार होती, मात्र तांत्रिक कारणामुळे ते होऊ शकले नाही. 'आजच्या प्रवासात दादांशी तुमचं नक्की बोलणं करून देईन,' असा शब्द तिने वडिलांना दिला होता. मात्र, काळाने घाला घातला आणि वडिलांची आपल्या लाडक्या नेत्याशी बोलण्याची आणि लेकीला पाहण्याची इच्छा कायमची अधुरी राहिली. मुंबईच्या बी.डी.डी. चाळीतील एका सामान्य कुटुंबातील मुलीचा असा अकाली जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

विदीप जाधव यांच्या निधनाने कुटुंबासह शेजारीही सुन्न

दादांचे सावलीसारखे सोबती आणि त्यांचे सुरक्षा रक्षक विदीप जाधव यांचा या अपघातात दुर्दैवी अंत झाला. सकाळी आनंदाने कामावर गेलेल्या विदीप यांच्या मृत्यूची बातमी धडकताच ठाणे-कलवा परिसरात शोककळा पसरली आहे. आज सकाळीच चाळीतील शेजाऱ्यांनी विदीप यांना नेहमीप्रमाणे ड्युटीवर जाताना पाहिले होते. मात्र, टीव्हीवर अपघाताची बातमी येताच त्यांच्या आईने हंबरडा फोडला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कळवा पोलिसांनी तातडीने जाधव यांच्या घरी धाव घेतली आणि त्यांच्या आई व मुलाला बारामतीकडे नेले. विदीप यांची पत्नी कालच माहेरी गेली होती, या दुर्दैवी बातमीने संपूर्ण कुटुंब विखुरले गेले आहे. विदीप जाधव यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि दोन लहान मुले असा परिवार आहे. पोलीस दलात असूनही त्यांचा स्वभाव अत्यंत मदतीचा आणि मनमिळाऊ होता. 'आमचा हसता-खेळता शेजारी गेला,' अशा भावना व्यक्त करत, शासनाने या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत करावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

### पार्थिव पुन्हा...

उपस्थितांचे आभार मानताना जय पवारांना अश्रू अनावर

अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीमध्ये अत्यंत शोकाकुल वातावरण पाहायला मिळत आहे. विद्या प्रतिष्ठानमधील अंत्यदर्शन आटोपल्यानंतर दादांचे पार्थिव पुन्हा रुग्णालयात नेण्यात येणार असल्याची माहिती त्यांचे पुत्र जय पवार आणि पार्थ पवार यांनी दिली. यावेळी जमलेल्या जनसागराशी संवाद साधताना जय पवार यांना आपले अश्रू आवरता आले नाहीत. जय पवार यावेळी अत्यंत भावूक झाले होते. उपस्थितांशी बोलताना ते म्हणाले, 'तुम्ही सर्वांनी दादांवर जे अफाट प्रेम केले, ते आज या गर्दीच्या रूपाने मला दिसत आहे. मी तुम्हा सर्वांचा मनापासून आभारी आहे. दादा आज आपल्यात नसले, तरी ते आपल्या सर्वांच्या मनात आणि हृदयामध्ये कायम जिवंत राहतील.' 'दादांनी आजपर्यंत आपल्या सर्वांसाठी ज्या जिद्दीने लढा दिला, तसाच लढा आपल्याला भविष्यातही द्यायचा आहे,' असा निर्धार जय पवार यांनी व्यक्त केला. उद्या सकाळी ११ वाजता अंतिम संस्कारांसाठी पुन्हा एकत्र येण्याचे आवाहन करताना जय पवारांचा कंठ दाटून आला आणि त्यांच्या डोळ्यांतून पाणी वाहू लागले. हे हृदयद्रावक दृश्य पाहून उपस्थित प्रत्येक कार्यकर्त्याचे डोळे पाणावले होते.

'सहकार्य करा, संयम राखा'; पार्थ पवार

दादांचे पार्थिव पुन्हा रुग्णालयात नेण्याची वेळ आली असता, पार्थ पवार यांनी जमलेल्या जनसागराला भावूक साद घालत शांतता राखण्याचे आवाहन केले. वाढती गर्दी आणि चेंगराचेंगरीची शक्यता लक्षात घेऊन पार्थ पवार म्हणाले, 'आम्हाला तुमच्या सहकार्याची गरज आहे. येथून बाहेर पडताना सर्वांनी शिस्त पाळावी. कोणालाही धक्का लागणार नाही, विशेषतः महिलांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्या.' उपस्थित कार्यकर्त्यांनी प्रशासनाला सहकार्य करावे, जेणेकरून पुढची प्रक्रिया सुरळीत पार पडेल, अशी कळकळ त्यांनी व्यक्त केली. पार्थ पवारांनी माहिती दिली की, उद्या सकाळी १० वाजता पुन्हा सर्वजण याच ठिकाणी जमणार आहोत. 'आम्ही सर्वजण इथे पुन्हा येणार आहोत, तोपर्यंत सर्वांनी शांततेत आपापल्या घरी जावे,' असे आवाहन त्यांनी केले. शोकाकुल वातावरणातही पार्थ पवारांनी दाखवलेल्या या संयमी नेतृत्वामुळे गर्दीवर नियंत्रण मिळवणे शक्य झाले.

### अजित पवारांच्या...

त्यांच्या कुटुंबीयांना बळ मिळो अशी ईश्वर चरणी प्रार्थना.

**–जयंत पाटील**

अजितदादांकडून महाराष्ट्राच्या अजून खूप मोठ्या कार्याच्या अपेक्षा असतानाच त्यांचे अपघाती निधन आम्हा सर्वांच्या राजकीय जीवनात कायमस्वरूपी पोकळी निर्माण करणारे आहे. राष्ट्रवादी परिवारातील आम्हा सर्व सहकाऱ्यांच्या आयुष्यातील आजचा दिवस सर्वात वाईट दिवस आहे असेच म्हणावे लागेल. अजितदादांच्या निधनाची बातमी ही अक्षरशः सुन्न करून टाकणारी आहे. अजितदादा आणि माझे गेल्या जवळपास ३५ ते ४० वर्षांपासूनचे मैत्रीपूर्ण संबंध होते. प्रदीर्घकाळ आम्ही एकत्र काम केले. महाराष्ट्राच्या राजकीय सार्वजनिक जीवनाला अजितदादा पवार यांच्याकडून अजून मोठ्या कार्याची अपेक्षा असतानाच अशा प्रकारे अजित दादांचे अपघाती निधन आम्हा सर्वांच्या राजकीय जीवनात एक कायमस्वरूपी पोकळी निर्माण करून गेलेले आहे. दादांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचे जे नुकसान झाले आहे ते नुकसान कधीही भरून निघणार नाही. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक सर्वाधिक उत्तम प्रशासक व एक अत्यंत मोठा लोकनेता महाराष्ट्राने कायमचा गमावला आहे. अजित दादांची उणीव कायम भासत राहील.

**राज ठाकरे**

माझे मित्र आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं निधन झालं. महाराष्ट्राच्या राजकारणाने एक उमदा नेता गमावला. अजित पवार यांचा आणि माझा राजकारणातला प्रवेश हा काहीसा एकाच काळातील, अर्थात आमचा परिचय हा बराच नंतरचा. पण राजकारणावर कमालीचं प्रेम या एका गुणावर अजित पवारांनी महाराष्ट्राच्या राजकारणात खूप मोठी झेप घेतली. अजित पवार हे पवार साहेबांच्या मुशीत जरी तयार झालेले नेते असले, तरी त्यांनी नंतर स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. आणि ही ओळख महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ठसवली. १९९० च्या दशकांत महाराष्ट्रात शहरीकरणाने वेग पकडला. ग्रामीण भाग अर्धशहरीपणाकडे झुकू लागला, तरी तिथल्या राजकारणाचा बाज हा ग्रामीणच होता, जरी तिथल्या प्रश्नांचं स्वरूप हे काहीसं शहरी होत चाललं असलं तरी. या पद्धतीच्या राजकारणाचा पूर्ण अंदाज आणि ते उत्तम पद्धतीने कसं हाताळायचं याचं कसब अजित पवारांकडे होतं. पिंपरी चिंचवड आणि बारामती ही त्याची दोन उत्तम उदाहरणं. पिंपरी चिंचवड असेल की बारामती असेल अजित दादांनी या भागांचा कायापालट केला हे त्यांचे राजकीय विरोधक पण मान्य करतील. प्रशासनावर अचूक पकड आणि एखाद्या फाईलीचा गुंता सोडवताना त्याची गाठ नक्की कुठून सोडवायची याचं अचूक ज्ञान असलेला हा नेता होता. प्रशासन हे सत्ताधाऱ्यांच्या पेक्षा वरचढ होण्याच्या काळात असा नेता महाराष्ट्राने गमावणं हे अतिशय दुर्दैवी आहे. अजित पवार हे कमालीचे स्पष्टवक्ते होते. काम होणार नसेल तर ते तोंडावर सांगायचं आणि होणार असेल तर त्यासाठी ते सगळी शक्ती लावायचे. आश्वासनं देऊन स्वतः भोवती माणसांचा पिंगा घालायचा हा त्यांचा स्वभाव नव्हता. राजकारणात सडेतोडपणाची आणि स्पष्टवक्तेपणाची किंमत मोजावी लागते, त्याचा अनुभव मला पण आहे आणि त्यामुळे ती अजित पवारांना पण किती मोजायला लागली असेल याचा अंदाज करता येतो. अजित पवारांचं मला आवडणारं अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ते अजिबात जातीय नव्हते आणि त्यांच्या राजकरणात जातीपातीला अजिबात स्थान नव्हतं. सध्याच्या राजकारणात जातपात न मानता राजकारण करण्याचं धारिष्ट्य दाखवणारेच नेते कमी उरलेत, त्यात अजित पवार हे अग्रणी होते हे नक्की. राजकारणातला विरोध हा राजकीय असतो, तो व्यक्तिगत नसतो. त्यामुळे एकमेकांवरची जहरी टीका ही व्यक्तिगत घ्यायची नसते, हे भान असलेले नेते महाराष्ट्रात कमी होत चालले आहेत. राजकारणातले दिलदार विरोधक एका मागे एक जाणे हे महाराष्ट्राच्या उमद्या राजकारणाचं मोठं नुकसान आहे. मी आणि माझं कुटुंबीय पवार कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे अजित पवारांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे**

दिलेला वेळ आणि शब्द पाळणारे, अशी ख्याती असलेले राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार अचानक वेळेआधी आपल्याला सोडून गेले... आज दिनांक २८ जानेवारीचा दिवस या अतिशय धक्कादायक आणि दुःखद घटनेने उजाडला ज्यामुळे आपण सर्वच शोकमग्न झालो आहोत. अजितदादा आपल्यात नाहीत हे स्वीकारायला मन अजूनही तयार नाही, इतकी ही घटना अनपेक्षित आणि खोल वेदनादायी आहे. वक्तशीरपणा, स्पष्टवक्तेपणा, प्रशासनिक नैपुण्य, संवेदनशील नेतृत्व आणि या सर्वांचा आधार असलेले धडाडीचे विकासोन्मुख राजकारण, असे त्यांच्या विलक्षण कार्यकर्तृत्वाचे योगदान महाराष्ट्र सदैव स्मरणात ठेवेल. पवार कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सर्व सहभागी आहोत. माझी अजितदादा यांना आणि या दुर्दैवी विमान अपघात घटनेत प्राण गमवावे लागलेल्या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली... ओम शांती.

**छगन भुजबळ**

अजितदादादांशी माझे ऋणानुबंध राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेच्या आधीपासून आहेत. करारी, रोखठोक स्वभाव असलेल्या अजितदादांनी विचारांशी कदापि तडजोड केली नाही. मला वाटतं हेच त्यांच्या आणि माझ्या स्वभावातील साम्य होतं. त्यांनी शरद पवार साहेबांच्या नेतृत्वात बारामतीच्या स्थानिक राजकारणापासून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. पवार साहेबांप्रमाणेच महाराष्ट्रातील जनतेची नस ओळखणारा आणि सर्वसामान्यांशी जोडला गेलेला नेता अशी त्यांची ओळख होती. याच जोरावर त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली, महाराष्ट्राच्या राजकारणावर अमीट ठसा उमटविला. स्वभावाने रोखठोक, प्रशासनावर घट्ट पकड आणि व्यक्तिमत्वात एक दरारा असलेला राजकारणी अशी प्रतिमा असूनही मनाने अतिशय स्वच्छ आणि जिंदादिल असलेल्या अजितदादांचा वावर चैतन्य निर्माण करणारा असायचा. पत्रकारांशी बोलताना प्रतिकूल असलेल्या प्रश्नांवरही मिश्किल चिमटे काढणारे दादा, अनावधानाने काही चूक झाली असेल तर मोठ्या मनाने दिलगिरी व्यक्त करणारे दादा देखील या महाराष्ट्राने पाहिले आहेत. त्यांनी माझ्या ज्येष्ठत्वाचा कायम सन्मान केला. दादांनी मला आणि आमच्या भुजबळ कुटुंबाला दिलेलं प्रेम कायम स्मरणात राहील. पवार कुटुंबियांच्या दुःखात मी सहभागी आहे. त्यांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो. अजितदादा यांच्या आत्म्यास सद्गती लाभो, हीच प्रार्थना! दादा,हा महाराष्ट्र तुम्हाला कधीच विसरणार नाही.

**भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अकाली निधनाची घटना अतिशय दुःखद, धक्कादायक आणि मन सुन्न करणारी आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक कणखर, शिस्तबद्ध, वक्तशीर आणि कार्यतत्पर नेतृत्व गमावले आहे. ही पोकळी कधीही भरून निघणार नाही, या शब्दात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या. प्रशासनावर जबरदस्त पकड आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास असलेले धडाडीचे नेते अशी त्यांची ओळख होती. महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री पद भूषवण्याचा विक्रम त्यांनी नोंदवला होता. यासोबतच सिंचन, ऊर्जा आणि वित्त अशा महत्त्वाच्या खात्यांचा कार्यभार सांभाळताना त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आपली अमिट छाप सोडली असेही प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी आपल्या शोकसंदेशात नमूद केले आहे. अजितदादांच्या दिवंगत आत्म्यास सद्गती लाभो. या दुःखद प्रसंगात संपूर्ण भाजपा परिवार पवार कुटुंबीय, त्यांचे कार्यकर्ते आणि समर्थक यांच्या पाठीशी आहे. त्यांना या दुःखातून सावरण्याचे बळ लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना! असेही प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

**नवाब मलिक**

अजितदादा हे केवळ माझे नेते नव्हते, तर ते माझ्या कुटुंबाचे आधारवड होते. माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण आणि संघर्षाच्या काळात, दादा माझ्या आणि माझ्या कुटुंबाच्या पाठीशी ढाल बनून खंबीरपणे उभे राहिले. त्यांनी दिलेली ती साथ मी कधीही विसरू शकणार नाही अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक यांनी आपला शोक व्यक्त केला आहे. दादांच्या निधनाने केवळ माझेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले आहे. एक कर्तव्यदक्ष आणि शब्दाला पक्का असणारा लोकनेता आपण गमावला आहे. दादा, तुमच्या आठवणी आणि तुमचे मार्गदर्शन सदैव माझ्या स्मरणात राहील असे सांगतानाच नवाब मलिक यांनी आदरणीय अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे.

**– प्रफुल पटेल**

आमचे नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने आमचा आधारस्तंभ हरपला आहे. ही घटना अत्यंत वेदनादायी आणि धक्कादायक आहे. गेली अनेक वर्षे मी त्यांच्यासोबत काम केले. जेव्हा-जेव्हा दादांसोबत भेट होत असे, ते नेहमीच आस्थेने चौकशी करत. तब्येतीची काळजी घेण्याचा नेहमीच सल्ला देत असत. त्यांचे आणि माझे राजकारणापलीकडे कौटुंबिक संबंध होते. दादांचे निधन ही माझ्यासाठी फार मोठी वैयक्तिक हानी आहे असेही प्रफुल पटेल यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

अजितदादांचे जाणे हे केवळ एका नेत्याचे जाणे नाही; देशाने एक दूरदृष्टीसंपन्न नेता गमावला आहे आणि मी माझा एक जिवलग ज्येष्ठ मित्र! अजितदादा आता आपल्यात नाहीत ही जाणीव अजूनही मनाला स्वीकारता येत नाही, या शब्दात महसूलमंत्री तसेच नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शोकसंवेदना व्यक्त केली. शोकसंवेदनेत ते म्हणतात,' महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री, माझे ज्येष्ठ मित्र अजितदादा पवार यांच्या बारामती येथील विमान अपघातातील दुर्दैवी निधनाच्या बातमीने मी अक्षरशः हादरून गेलो आहे. मन सुन्न झाले आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला दिशा आणि गती देणारे लोकनेते म्हणून अजितदादांचे व्यक्तिमत्त्व कायम स्मरणात राहील. प्रशासनावरची त्यांची मजबूत पकड, कामाचा अफाट वेग आणि लोककल्याणाचा अखंड ध्यास या साऱ्यांमुळे त्यांनी जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले.अजितदादांचा प्रशासनातील अनुभव अतिशय समृद्ध होता. अनेकदा मी स्वतः त्यांच्याकडून सल्ला घेत असे, विविध विषयांवर त्यांच्याशी हक्काने चर्चा करीत असे. महायुतीत कार्य करत असताना अनेक प्रश्नांवर मोकळेपणाने संवाद साधण्याची त्यांची शैली मला नेहमी प्रेरणा देणारी वाटली. त्यांच्या सहवासातून मी स्वतः अनेक गोष्टी शिकलो.

**१७) उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे**

मी मुख्यमंत्री असताना अजित पवार हे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री होते. अत्यंत शिस्तप्रिय, आपल्या खात्यावर वचक आणि अर्थ विभागाचा अभ्यास असणारे ते नेते होते. एक उत्तम सहकारी म्हणून त्यांचे माझे विशेष नाते जमले. अजित पवार हे दिलखुलास होते. मनात येईल ते बोलायचे. ते दीर्घद्वेषी नव्हते. राजकारणात त्यांनी वेगळा मार्ग स्वीकारला, तरी त्यांनी संबंध तुटू दिले नाहीत. महाराष्ट्रात ते 'दादा' म्हणून लोकप्रिय होते. ते असे अकाली जातील असे वाटले नव्हते. कार्यकर्त्यांना जपणारा नेता म्हणून ते परिचित होते. त्यांच्या जाण्याने राज्यातील नेतृत्वात पोकळी निर्माण झाली. ते सर्वार्थाने 'दादा' होते. दादांना माझ्यातर्फे, 'ठाकरे' व शिवसेना परिवारातर्फे श्रद्धांजली!

आजची सकाळ ही सुन्न करणारी आहे ! राजकारणातल्या मोठ्या पदावर असणाऱ्या नेत्याचं असं जाणं धक्कादायक आहे.

प्रशासनावर असलेली पकड आणि स्पष्ट स्वभाव यामुळे अजितदादा पवार लोकप्रिय होते.एक सुसंस्कृत स्पष्ट वक्ता महाराष्टातील आज हरवला आहे अशी प्रतिक्रिया राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी व्यक्त केली

राज्याचे उपमुख्य मंत्री अजित पवार व माझा अनेक वर्षापासून संबंध आले सहकार क्षेत्र सहकारी बँका, साखर उद्योग यावर अनेकदा सकारात्मक चर्चा व्हायची लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या मंत्रिमंडळात मीं व अजितदादा पवार दोघांनीही एकत्रित काम केलें एखादा निर्णय घ्यायचा असेल तर ते स्वतः ला झोकून द्यायचे काम करायचे त्यांचा स्वभाव रोखठोक बोलणे एकदा शब्द दिलेला ते पाळत असणारे उत्तम प्रशासक म्हणून ओळखले जाणारे अजितदादा पवार यांच्या अकाली जाण्याने राज्यातील लोकाभिमुख नेता हरवल्याचे दुःख आहे

**– दिलीपराव देशमुख**

शोक संदेश अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राने एक स्पष्टवक्ता, शिस्तबद्ध आणि कार्यतत्पर नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी आहे. या दुःखद प्रसंगी अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो..!!

**बसवराज माधवराव पाटील**
जिल्हाअध्यक्ष,
भारतीय जनता पार्टी,लातूर ग्रामीण

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिंग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# देगलूरमध्ये प्रजासत्ताक दिनी देशभक्तीपर गीतावर कवायत संपन्न



देगलूर(प्रतिनिधी): महाराष्ट्र राज्यात शासनाने २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी सर्व शाळा,महाविद्यालय आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये शासकीय संस्थांमध्ये 'राष्ट्र प्रथम' या संकल्पनेवर आधारित देशभक्तीपर गीतांवर आधारित सामूहिक कवायतीचे (group Drill) आयोजन करण्यास सांगितले होते. ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीचा उत्साह वाढतो, विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, स्वयंशिस्त, राष्ट्रभक्ती राष्ट्रप्रेम,आरोग्य जागृती,योगा करून घेण्यासाठी आणि एकात्मता रुजण्यास मदत करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये संविधानाप्रती आदर व्यक्त करण्याचा हा एक सामूहिक प्रयत्न आहे. देगलूर तालुक्यामध्ये ध्वजवंदन कार्यक्रमानंतर एकाच वेळी सामूहिक कवायतीचे प्रदर्शन खूपच सुंदर कार्यक्रम झाला, सामूहिक कवायतीमुळे विद्यार्थ्यांच्या अचूक हालचाली व स्वयंशिस्तीचे उत्तम उदाहरण दिसून आले. कवायत संचलनाने स्वतंत्र, समता आणि बंधुता या लोकशाही मूल्यांचे दर्शन दिसून आले, थोडक्यात सांगायचे तर प्रजासत्ताक दिनी कवायत हा केवळ एक सोहळा नसून तो भारताच्या सार्वभौमत्वाची आणि एकतेची शक्ती जगाला दाखवणारा एक महत्त्वाचा सोहळा बनला आहे. साधारणत: १५ ते २० मिनिटांचा हा कवायतीचा कार्यक्रम घेण्यात आला.

सर्व शाळांमध्ये लोकप्रतिनिधी, अधिकारी,ग्रामस्थ, शिक्षण प्रेमी,पालक,समाजसेवी, गणमान्य प्रतिनिधी अशा अनेक मान्यवरांनी याचे खूप कौतुक केले. यामध्ये देगलूर तालुक्यातील सप्तगिरी पोतदार शाळा, जागृती विद्यालय होट्टल, साधना हायस्कूल देगलूर , जि.प.प्रा.शा.तडखेल, माननीय उपजिल्हाधिकारी कार्यालय देगलूर तसेच तालुक्यातील सर्व शाळेमध्ये देशभक्ती गीतांवर सामूहिक कवायत असा सुंदर कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाला उपस्थिती मान्यवर देगलूर बिलोली मतदार संघाचे आमदार सन्माननीय जितेश अंतापूरकर,देगलूर नगरपालिका नगराध्यक्षा सौ. टेकाळे मॅडम ,उपजिल्हाधिकारी माननीय अनुप पाटील,

तहसीलदार भरत सूर्यवंशी,

गटविकास अधिकारी

श्रीकांत बळदे ,मुख्याधिकारी श्रीमती.गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे, तालुका आरोग्य अधिकारी ,तालुका अभियंता अधिकारी, नगरसेवक, हायस्कूल मुख्याध्यापक तसेच देगलूर शहरातील शिक्षणप्रेमी नागरिक व पालक यांच्या उपस्थितीत अत्यंत प्रसन्न उल्हासदायक वातावरणात हा सोहळा संपन्न झाला. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या करण्यासाठी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बालाजी गोडाजी, सदरील कार्यक्रमाचे देगलूर तालुका नोडल अधिकारी शिक्षण विस्तार अधिकारी हमीद दौलताबादी, सर्व केंद्रप्रमुख,सर्व विशेष शिक्षक,सर्व विषय तज्ञ,सर्व मुख्याध्यापक यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर सारवरा येथे यशस्वीरीत्या संपन्न

बाभळगाव : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, ग्रामपंचायत साखरा आणि दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष युवक शिबिर सांगता समारंभ मौजे साखरा ता. जि. लातूर येथे संपन्न झाला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव उपाध्यक्ष नरसिंह देशमुख होते तर मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सदस्य भीमराव शिंदे, डॉ. दशरथ भिसे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, मुख्याध्यापक स्वामी मॅडम, गायकवाड गुरुजी यांची उपस्थिती होती.

प्रमुख मार्गदर्शन करताना डॉ. दशरथ भिसे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. युवकांनी समाजाशी जोडलेले राहून राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सेवा, शिस्त आणि समर्पण या मूल्यांचा अंगीकार केल्यास विद्यार्थी खऱ्या अर्थाने जबाबदार नागरिक घडू शकतात, असे प्रतिपादन केले.

प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे म्हणाले,' विशेष शिबिराच्या यशस्वी आयोजनात गावकऱ्यांचे




मोलाचे सहकार्य लाभले. निवास, भोजन तसेच उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी गावकऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. गाव व महाविद्यालय यांच्यातील हा सुसंवाद भविष्यातही अधिक दृढ व्हावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करतो.'

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. सुरेशकुमार कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. माना गायकवाड यांनी केले. स्वयंसेवकाच्या वतीने ओंकार सुरवसे यांनी स्वच्छता मोहीम, जनजागृती फेऱ्या, वृक्षारोपण, आरोग्यविषयक जनजागृती तसेच सामाजिक एकोपा वाढविणाऱ्या उपक्रमांचा उल्लेख विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात केला. या शिबिरामुळे समाजाकडे पाहण्याची दृष्टी अधिक व्यापक झाली, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. नरेंद्र देशमुख यांनी मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. जयदेवी पवार, डॉ. वैशाली माढेकर, प्रा. शितल खोत, डॉ. शाहुराज मुळे, डॉ. नाना जाधव इतर प्राध्यापक, स्वयंसेवक, विद्यार्थी, साखरा येथील ग्रामस्थ, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# समाजसेविका शिल्पाताई लोखंडे यांना संघर्षनायिका पुरस्कार जाहीर

नांदेड- येथील समाजसेविका शिल्पाताई लोखंडे यांना अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स महाराष्ट्र राज्यस्तरीय संघर्ष नायिका पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार जाहीर

झाल्याबद्दल भारतीय बौद्ध महासभेच्या नांदेड उत्तर जिल्हाध्यक्षा अनिताताई कंधारे, दक्षिण जिल्हाध्यक्षा रेखाताई पंडित, शहराध्यक्षा कीर्तीताई गायकवाड, समाजसेविका नीलमताई थोरात, वार्ड शाखा अध्यक्षा आशाताई चौंदते तसेच गयाबाई हाटकर, केराबाई कापुरे, भिमाबाई हटकर, गयाबाई कांबळे, सखुबाई हिंगोले, रेणुकाबाई गजभारे, सुरेखाबाई येवले, महामाया येवले, सविताबाई येवले, विमलबाई हटकर, सरोजा येवले, रेखाबाई हिंगोले, सुरेखाताई गायकवाड, लक्ष्मीबाई नवघडे, लक्ष्मीबाई गोडबोले, गयाबाई लांडगे, कल्पनाबाई ढेपे, सौभद्राबाई गोडबोले, रमाबाई कोकरे, रंजनाबाई हिंगोले, गोदावरीबाई राजभोज, सुजाताई लोणे, शोभाबाई लोखंडे, रेणुकाबाई लोखंडे, संघमित्रा लोखंडे, प्रतिभा लोखंडे, आशाबाई राजभोज यांनी अभिनंदन केले आहे.

आपले समाजकार्य, नेतृत्वगुण, तसेच जनसेवेसाठी दिलेले निःस्वार्थ योगदान हे समाजासाठी प्रेरणादायी असल्याची दखल घेऊन लोखंडे यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. सदरील पुरस्कार ३१ जानेवारी २०२६ रोजी, सिडको, नांदेड येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. या निमित्ताने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय बौद्ध महासभा - वार्ड शाखा, भीमघाट (देगाव चाळ) व रमामाता महिला मंडळ, देगाव चाळ, येथील सुनंदाबाई गजभारे, नंदाबाई नरवाडे, सरसाबाई थोरात, करुणाबाई गायकवाड, वछलाबाई ढगे, आशाताई बहादुरे, लक्ष्मीबाई चित्रपू, गीताबाई दिपके, रमाबाई सातोरे, निर्मलाबाई पंडित, आम्रपाला कदम, ताईबाई नवघडे, सुरेखाबाई सदावर्ते, सविताबाई हटकर, पारूबाई हिंगोले, प्रतिभा गोडबोले, सुमनबाई वाघमारे, भागीरथाबाई थोरात, आशाबाई हटकर, चौत्राबाई चिंतोरे, पदमीनबाई गोडबोले, वैशाली निखाते, बबीताबाई हटकर, छायाबाई थोरात, कृष्णाबाई हटकर, भिमाबाई भोळे, गंगासागर धुळे, लक्ष्मीबाई निखाते, सत्वशीला खिल्लारे, शोभाबाई पवार, क्रांतीबाई खिल्लारे, लक्ष्मीबाई कापुरे, अनिताबाई चिंतोरे, सीताबाई थोरात, निलाबाई नरवाडे, सुकेशनी गजभारे, इंद्राबाई नरवाडे, नागराबाई थोरात, संगीताबाई थोरात, करुणाबाई नरवाडे, सुजाता पंडित, कमलबाई वंजारे, शोभाबाई नरवाडे, गंगाबाई कोकरे, अनिताबाई गोडबोले, संघमित्रा खाडे, अरुणाबाई लोखंडे यांची उपस्थिती होती.

### भंडारवाडी येथील शिवसेना (ठाकरे) च्या सैनिकांचा भाजपात प्रवेश

धाराशिव (प्रतिनिधी) - तालुक्यातील भंडारवाडी येथील शिवसेना (ठाकरे) चे प्रमुख कार्यकर्ते सुदर्शन माळी, ओम शिनगारे, रामकृष्ण माळी, महादेव माळी, जयराम धोंड, सोसायटीचे चेअरमन अजित माळी, मनोज माळी, महादेव माळी यांनी विकासाच्या राजकारणावर विश्वास ठेवत भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. जिल्ह्यातील महाविकास आघाडीतील असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते भाजपात प्रवेश करत असून त्यामुळे भाजप संघटन अधिक भक्कम होत आहे. यावेळी सुरेश देशमुख, दत्ता देवळकर, दिलीप माळी, दिनेश बंडगर, अमोल पाटील, विष्णू एडके, सचिन एडके, अनिकेत गुळिमरे, ओम एडके, संदीप एडके, अमोल बंडगर, गोपाळ माळी, रामराजे पाटील यांच्यासह इतर उपस्थित होते.

# वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा





देगलूर (प्रतिनिधी) : २६ जानेवारी रोजी वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहवर्धक वातावरणात साजरा करण्यात आला. प्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी व संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. मुक्ताई प्रतिष्ठानचे सचिव माननीय राजेश महाराज देगलूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांच्या शुभहस्ते तिरंगा ध्वज फडकवण्यात आला व ध्वजाला सर्वांनी सलामी दिली. यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गणपत कारीकंटे यांच्या करवी सर्व उपस्थितांनी संविधानातील उद्देशिकेचे वाचन केले तसेच तसेच प्रा. शंकर पाटील यांच्या करवी शिक्षक, पालक, विद्यार्थी यांनी कॉपी मुक्त अभियानाची प्रतिज्ञा घेतली.

या वेळी राष्ट्रीय कौशल्य विकास केंद्राच्या वतीने विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध समाजोपयोगी व पर्यावरण पूरक वस्तू विषयी माहिती कौशल्य केंद्राच्या प्रशिक्षिका माकणे लक्ष्मी, वैद्य स्नेहा, पोटफोडे राजश्री यांनी दिली तर राजकुमार हंद्रे यांनी संगणकीय प्रशिक्षणा विषयी माहिती दिली.

आगामी कृत्रिम बुद्धिमत्तेचा काळ आव्हानात्मक असून कौशल्य वृद्धी शिवाय पर्याय असणार नाही, असे मत या प्रसंगी राजेश महाराज देगलूरकर यांनी व्यक्त करून सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. ध्वजारोहण समारंभास उपप्राचार्य तथा क्रीडा संचालक डॉ. दिलीप भडके, उपप्राचार्य डॉ. संजय अवधाने, उपप्राचार्य डॉ. प्रकाश कुकाले, मुख्य लिपिक धनंजय देशपांडे तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. ध्वजारोहण समारंभाचे पूर्ण नियोजन डॉ. दिलीप भडके यांनी केले.

# जेएसपीएम संचालित शिवाजी विद्यालय बिटरगाव येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

लातूर - रेणापूर तालुक्यातील बिटरगाव येथील शिवाजी विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जेएसपीएम संस्थेचे संचालक अप्पासाहेब पाटील यांच्याहस्ते व मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण यांच्या उपस्थितीत विद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण कार्यक्रम मोठ्या उत्साहात सपन्न झाला.

या कार्यक्रमास गावाचे सरपंच महेंद्र पाटील, भाऊसाहेब गाडे, हरिभाऊ पाटील, भगवान पाटील, नानासाहेब पाटील, सुप्रिया रामदासी, केंद्रप्रमुख राजेश्वर व्यवहारे, अंकुश शेळके, माधव रेड्डी आदी मान्यवर उपस्थित होते. ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर राष्ट्रगीत, भारतीय राज्यघटनेचे वाचन, राज्यगीत सादरीकरण, कॉपीमुक्त अभियानाची व मतदानाची शपथ घेण्यात आली. देशभक्तीपर गीतावर विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध कवायत, मुलींनी कराटे ,लाठी प्रदर्शन सादर केली. प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कलागुणांना वाव देणारा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. काही विद्यार्थिनींनी प्रभावी भाषणे सादर केली. तसेच इयत्ता ५ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी शालेय अंतर्गत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना आप्पासाहेब पाटील यांच्याहस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण यांनी केले. यावेळी त्यांनी विद्यालयात वर्षभर राबविण्यात येर्णाया विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण काळे सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विनोद जाधव, वसंत यादव, वेणूनाथ यादव, मल्लिकार्जुन ठोंबरे, गौतम जाधव, रमाकांत यशवंत, पद्माकर लकडे, विनायक घार, गंगाधर इरले आदी शिक्षक व कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

# दयानंद विज्ञानच्या कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी यांच्या 'फंडामेंटल ॲप्रोचेस अँन्ड ॲडव्हान्स्ड टेक्निक्स फॉर सिंथेसिस ऑफ नॅनोमेटेरियल्स ' या पुस्तकाचे प्रकाशन



लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.विजेंद्र अनंत चौधरी यांच्या ' फंडामेंटल ॲप्रोचेस अँन्ड ॲडव्हान्स्ड टेक्निक्स फॉर सिंथेसिस ऑफ नॅनोमटेरियल्स ' या पुस्तकाचे प्रकाशन दि.२६ जानेवारी २०२६ रोजी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते झाले.याप्रसंगी संस्थेचे संयुक्त सचिव विशाल लाहोटी,कुणाल कोरे,संस्थेचे इतर सदस्य व पदाधिकारी, संस्थेचे एडिओ डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर, प्राचार्य डॉ.पुनम नथानी,प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते,प्राचार्य डॉ.वाजिद चाऊस, प्राचार्य प्रीती पटवारी, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर,सेल्फ फायनान्सचे प्रिन्सिपॉल प्रा.अनिलकुमार माळी यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

नॅनोटेक्नॉलॉजी अभूतपूर्व कामगिरी आणि क्षमता साध्य करण्यासाठी नॅनोस्केलवर सामग्री हाताळून अनेक क्षेत्रांमध्ये क्रांती घडवत आहे.'नॅनोमटेरियल्स: परिचय आणि अनुप्रयोग' हे एक व्यापक संसाधन आहे जे नॅनोमटेरियल्सच्या मूलभूत संकल्पना, संश्लेषण पद्धती, अद्वितीय गुणधर्म आणि विविध अनुप्रयोगांमध्ये खोलवर जाते.सदरील पुस्तक या क्षेत्राचे सखोल अन्वेषण प्रदान करते, जे विद्यार्थी, संशोधकासाठी एक आवश्यक संदर्भ आहे.हे पुस्तक वाचकांना नॅनोमटेरियल्स,त्यांचे संश्लेषण, गुणधर्म आणि अनुप्रयोगांची व्यापक समज प्रदान करण्यासाठी डिझाईन केलेले आहे, तसेच त्यांच्या जबाबदार विकासासाठी महत्त्वाच्या बाबींवर देखील लक्ष केंद्रित करते.नॅनोटेक्नॉलॉजीच्या क्षेत्रातील रोमांचक प्रगतीमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांसाठी हे एक मौल्यवान संसाधन म्हणून उपयुक्त आहे.

सदरील पुस्तकन सोहळ्याच्या निमित्ताने दयानंद शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व विभाग प्रमुख व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

# विविध ठिकाणी शिवसेना (ठाकरे) पक्ष प्रवेशोत्सव

धाराशिव (प्रतिनिधी) - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करण्यासाठी विविध पक्षातील सक्रिय कार्यकर्ते उत्सुक आहेत. त्यातील दोन दिवसात घेतलेल्या प्रवेशामुळं विरोधकाच धाब दणाणल आहे. सत्ता नसताना सगळीकडे नकारात्मक वातावरण तयार करून सुद्धा संघर्ष करण्यासाठी एक मोठी फळी तयार होत असल्याच सकारात्मक चित्र आपोआप तयार झाले आहे.

धाराशिव तालुक्यातील अनसुर्डा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना (ठाकरे) पक्षात जाहीर प्रवेश घेतला. वंदनीय हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या ज्वलंत भगव्या विचारांनी प्रेरित होऊन, पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आमदार कैलास पाटील, संपर्कप्रमुख सुनील काटमोरे, सहसंपर्कप्रमुख नंदूभैय्या राजेनिंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली बालाजी माने, महेश पाटील, शरद गायकवाड,



अमोल तावरे, बिभीषण माने, राजाभाऊ गायकवाड, लक्ष्मण पवार, नंदकुमार माने, तानाजी माने, मुशीर शेख, कृष्ण वानकर, तानाजी पवार, सिद्धांत भोसले, प्रदीप सुतार, पांडुरंग माने, अंदिल बोंदर, पांडुरंग बोंदर, आदिल बोंदर, ज्ञानेश्वर माने, आरिफ शेख, सुरज पवार, दीपक माने, प्रशांत खापरे, अतिक मगर, विजय गायकवाड, रामा डोके, शंकर वाकर, पंडित मोकाशी, व्यंकटेश माने, अजित कुठे, युनू शेख, बालाजी सुतार, अनिकेत माने, रामनाथ माने, जगन्नाथ डोके, उमेश पवार, सागर अडसुळे, आबाराव माने, दादासाहेब माने, आप्पासाहेब माने, अक्षय काळे, अमोल डुरे, राहुल साळुंखे, मयूर जमदाडे, खंडू वांकर, अण्णा पांडुरंग गोंधळ, ज्ञानेश्वर पाटील, कृष्णा सुतार, राहुल माने, योगेश माने, आकाश चव्हाण, निर्वत माने, जयदीप माने यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश घेतला.

भाजपा तालुका कार्यकारणी सदस्य तसेच चिलवडीचे माजी उपसरपंच अजित सावंत व संतोष राजगुरु यांनी शिवसेना ठाकरे पक्षात प्रवेश केला. या प्रवेशामुळे चिलवडी परिसरात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत होणार असून, पक्षाच्या विचारांवर विश्वास ठेवून अनेक कार्यकर्ते एकत्र येत असल्याचे चित्र दिसत आहे. तसेच मोहतरवाडी व विठ्ठलवाडी येथील असंख्य युवकांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यामध्ये राजाभाऊ चव्हाण, उद्धव चव्हाण, अच्युत कांबळे, पद्माकर खोन, धनाजी गडकर, पोपट शेलार, वैभव मळगे, हनुमान शेळके, नेताजी मळगे, नारायण चव्हाण, ईश्वर चव्हाण, कृष्णा सुरवसे, अण्णा चव्हाण, शरद चव्हाण, विनोद मळगे, विनोद शेलार, लक्ष्मण चव्हाण, ज्ञानेश्वर आंधळे, कार्तिक पांचाळ, हनुमंत झुंबरे, सुरज चव्हाण, बबलू खोन, बाळू रूपचंद्र मळगे, विजय शेळके, प्रदीप मळगे, वैभव पाडुळे, महादेव पाडुळे, यश गडकर, हरिओम पाडुळे, रामेश्वर आंधडे, समाधान झुंबरे, ओमकार झुंबरे, गौतम पाटोळे, शरद चव्हाण, श्याम चव्हाण, दादासाहेब चव्हाण, सुमित मळगे, बापू मळगे, पिंट चव्हाण, बबलू आंधडे, विजय शिंगाडे, किरण मळगे, रविराज मळगे, रोहन चव्हाण, स्वप्निल चव्हाण, अनिकेत मळगे, दत्ता मस्के, साहेबराव चव्हाण, अमित आंधळे, धनाजी शेळके, बालाजी मळगे, अक्षय मळगे, ज्ञानेश्वर चव्हाण, काकासाहेब लाकाळ, सुरज चव्हाण, शाम चव्हाण, रेवन मळगे, अजय शेळके, उमेश गडकर, श्रीमंत चव्हाण, प्रकाश पाडुळे, लहू मस्के, आकाश चव्हाण, मोहन आंधळे, आप्पासाहेब चव्हाण, संतोष पाडुळे, बालाजी शेलार, किसन सुरवसे, विठ्ठल पाटोळे, प्रदम पाडुळे, पांडुरंग आंधळे, चंदर भोसले, सुशम चव्हाण, विकास चव्हाण यांचा समावेश होता. तर राष्ट्रवादी (अजीत पवार) अल्पसंख्याक सेलचे कळंब तालुकाध्यक्ष सतीश शिंपले यांनी प्रवेश केला. तसेच करजखेडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच शरद सुरवसे आणि ग्रामपंचायत सदस्य दादासाहेब नागटिळे यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश घेतला.

# नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखाली भारत महासत्ता बनून विश्वगुरू बनेल- माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर



लातूर -१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले व २६ जानेवारी १९५० पासून भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या सहकार्यातून तीन वर्षामध्ये घटनेची निर्मिती करून या घटनेच्या माध्यमातून सर्वसामान्यांना अधिकार देण्याचे काम सुरू करण्यात आलेले आहे. ११ सप्टेबर १८९३ मध्ये शिकागो येथे झालेल्या परिषदेमध्ये भारतीय संस्कृती व विचार कसे प्रभावशाली आहेत हे दाखवून देण्याचे काम राष्ट्रभक्त स्वामी विवेकानंदांनी केले. त्यामुळे स्वामी विवेकानदांनी १८ व्या शतकात केलेली भविष्यवाणी खरी ठरून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०४२ ते २०४७ मध्ये भारत विश्वगुरू बनेल, असे प्रतिपादन भाजपा नेते तथा भाजपा किसान मोचा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालय, स्वामी विवेकानंद विद्यालय, श्री.स्वामी विवेकानंद विद्यालय, स्वामी विवेकानंद इंटिग्रेशन इंग्लिश स्कूल, श्री.स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेज, स्वामी विवेकानंद उच्च माध्यमिक विद्यालय, स्वामी दयानंद कनिष्ठ महाविद्यालय, स्वामी विवेकानंद इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निक कॉलेज, स्वामी विवेकानंद इन्स्टिट्युट ऑफ आयटीआय कॉलेज, महाराष्ट्र कॉलेज ऑफ नर्सिंग, शिवाजीराव पाटील कव्हेकर कॉलेज ऑफ फार्मसी, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, राजमाता जिजाऊ मुला-मुलींचे वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने जेएसपीएम कॅम्पस एमआयडीसी पी-७४, कळंब रोड, लातूर येथे ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहन कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी या कार्यक्रमाला जे.एस.पी.एस.संस्थेच्या सचिव सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, जेएसपीएमचे फायनांन्स डायरेक्टर बापूसाहेब गोरे, प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारूती सूर्यवंशी, प्राचार्य लक्ष्मीकांत गौड, प्राचार्य शिवहार बोंडगे, प्राचार्य शैलेश कचरे, प्राचार्य संदिप पांचाळ, प्राचार्य शिरीन मॅडम, प्राचार्य मनोज गायकवाड, मुख्याध्यापक विकास लबडे, प्राचार्य वर्षा लबडे, प्राचार्य प्रद्युम्न इगे, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, उपप्राचार्य दयानंद हासबे, संस्थेचे मुख्य लेखापाल युवराज उफाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.कव्हेकर म्हणाले की, मोदीजींनी शिक्षण क्षेत्रामध्ये क्रांतीकारी बदल करण्याचे कार्य केले. भारत देशावर इंग्रजांनी दीडशे वर्ष राज्य केले तर निजामांनी मराठवाड्यावर २२४ वर्षे राज्य केले. त्यांच्या विरोधात येथील महात्म्यांनी मोठा लढा उभारण्याचे कार्य कले. आपण आपल्या मुलांना निजाम कोण, मुघल कोण पण छत्रपती शिवराय कोण, प्रभू रामचंद्र कोण हे सांगण्याचे काम आपण प्रभावीपणे केलेले नाही. त्यामुळे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी सीबीसीएस शिक्षण पध्दती लागू करून शिक्षण क्षेत्रामध्ये क्रांतीकारी बदल घडविण्याचे काम केलेले आहे.

त्यामुळे गेल्या पाच वर्षामध्ये शैक्षणिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे. हेच काम राष्ट्रपिता महात्मा गांधी, टिळक, स्वामी विवेकानंद, शामप्रसाद मुखर्जी यांच्या विचारातून पुढे चालू ठेवण्याचे काम मोदीजींनी केलेले आहे. एआय व सीबीसीएस शिक्षणाच्या माध्यमातून देशाला प्रगतीपथावर नेण्याचे काम केलेले आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून चंद्रावर वस्ती करण्याबरोबरच कृषी, शिक्षण, सौरऊर्जा व इलेक्ट्रिक व्हेकलच्या कार्यक्षेत्रामध्ये मोठी प्रगती साधण्याचे काम झालेले आहे. एसआपीमध्ये भारत अमेरिकेच्या मागे होता. परंतु त्यानंतर झालेल्या क्रांतीकारी बदलामुळे भारताची चौफेर प्रगती झालेली आहे. यामुळे भारताचा जीडीपी २०२४-२५ मध्ये ६.५ होता. तो आता २०२५-२६ मध्ये ७.४ वर जाईल. असा विश्वास आहे. भारताने केलेल्या चौफेर प्रगतीमुळे अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी भारताला बी ग्रेड देण्याचे कार्य केलेले आहे. त्यामुळे अमेरिका, रशिया, चीन यांच्या तुलनेत भारताची अर्थव्यवस्था सध्या पाचव्या क्रमांकावर आहे थोड्या दिवसात ती तिर्सया क्रमांकावर येईल व २०४२ ते २०४७ पर्यंत मोदीजींच्या नेतृत्वाखाली भारत महासत्ता बनून जगाचे नेतृत्व करेल असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व संस्थेच्या सचिव सौ. प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांच्याहस्ते भारतमाता, राष्ट्रपिता महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी विविध क्रीडा क्षेत्रामध्ये देदिप्यमान यश मिळवलेल्या खेळाडूंना पारितोषिक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य गोविंद शिंदे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार दत्ता होळ यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला प्राचार्य, शिक्षकेत्तर कर्मचार्यांसह पालक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# महाराष्ट्राचा आपला 'दादामाणूस' आणि विकासाचा कणा हरपला!

## अजित पवार यांना आमदार अमित देशमुख यांची आदरांजली

लातूर - बारामती येथील विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवार साहेब यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत धक्कादायक आणि सुन्न करणारे आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय पटलावरील एक धडाडीचे, स्पष्टवक्ते आणि विकासाभिमुख नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. या दुःखद घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र शोकाकुल झाला असून, लातूरचे आमदार अमित विलासराव देशमुख यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

'जे होईल ते होईल' म्हणणारा स्पष्टवक्ता नेता हरपला श्रद्धांजली वाहताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, अजितदादा हे केवळ एक नेते नव्हते, तर महाराष्ट्रातील प्रत्येक घराघरांत मानले जाणारे 'दादामाणूस' होते. प्रशासनावर त्यांची मजबूत पकड होती. 'जे काम होऊ शकते ते होईल' आणि 'जे होणार नाही ते स्पष्टपणे सांगणारे' ते महाराष्ट्रातील एकमेव निर्भीड नेते होते. सुस्पष्ट दृष्टिकोन आणि काटेकोर नियोजन ही त्यांची खास ओळख होती.

विलासराव देशमुख आणि अजितदादा: एक अतूट नाते अजितदादांच्या आठवणींना उजाळा देताना आमदार देशमुख यांनी नमूद केले की, माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या मंत्रिमंडळात दादांनी उपमुख्यमंत्री म्हणून अतिशय प्रभावी कार्य केले. पक्ष वेगळे असले तरी, पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून ते आदरणीय साहेबांचा नेहमी 'माझे आवडते मुख्यमंत्री' म्हणून उल्लेख करत. यातूनच त्यांच्या मनाचा निर्मळपणा आणि खिलाडूवृत्ती दिसून येत असे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मंत्री म्हणून काम करताना दादांशी आलेला निकटचा संपर्क आणि त्यांचे लाभलेले सहकार्य हे कायम स्मरणात राहील, अशी भावना अमित देशमुख यांनी व्यक्त केली. अलीकडच्या काळातही त्यांच्या भेटीत तीच आपुलकी आणि सहकार्याची भावना अनुभवायला मिळाली, असे त्यांनी नमूद केले.

या भीषण अपघातामुळे आणि अजितदादांच्या निधनामुळे निर्माण झालेल्या शोकाकुल परिस्थितीचा विचार करून, आज लातूर जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे सर्व नियोजित प्रचार कार्यक्रम, बैठका आणि सभा रद्द करण्यात येत आहेत, अशी घोषणा आमदार अमित देशमुख यांनी केली आहे. आम्ही सर्व देशमुख कुटुंबीय, पवार कुटुंबीयांच्या या दुःखात सहभागी आहोत. महाराष्ट्राच्या या लाडक्या नेतृत्वाला मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो आणि पवार कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना अशा शब्दात आपल्या भावना आमदार देशमुख यांनी व्यक्त केली.

# साईसेवक प्रतिष्ठानच्यावतीने १ फेब्रुवारी रोजी सार्वजनिक साईबाबा भंडारा उत्सव सोहळा



लातूर - गेल्या ४० वर्षापासून साईसेवक प्रतिष्ठान कव्हा नाका लातूरच्यावतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ३१ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत परम पुज्यनिय विद्यानंदजी महाराज (बाबा) गातेगावकर यांच्या उपस्थितीमध्ये सार्वजनिक साईबाबा भंडारा उत्सव २०२५-२६ चे आयोजन राजीव नगर, कव्हा ता.जि. लातूर येथे करण्यात आलेले आहे.

या भंडारा उत्सवानिमित्त ३१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ०७ ते १० या वेळेत भजन संध्या, ०१ फेब्रूवारी २०२६ रोजी सकाळी ०७ ते ०८ या वेळेमध्ये अभिषेक व महापुजा तर ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वा महाराष्ट्रातील प्रसिध्द कीर्तनकार परमपुज्य विद्यानंदजी महाराज (बाबा) गातेगावकर यांचे कीर्तन राजीव नगर, कव्हा ता.जि.लातूर येथे आयोजित करण्यात आलेले आहे. त्यामुळे कव्हा गाव व परिसरातील भाविकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन साईसेवक प्रतिष्ठान, कव्हा नाका, लातूर व समस्त ग्रामस्थ कव्हा यांच्यवतीने करण्यात आलेले आहे.

# जिल्हा परिषदेच्या १० व पंचायत समितीच्या २५ जागा वंचित बहुजन आघाडी स्वबळावर लढणार - संतोष सुर्यवंशी




लातूर /प्रतिनिधी- लातूर जिल्हा परिषदेच्या आगामी निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने स्वबळावर निवडणूक लढविण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या १२ गटांच्या जागांवर तसेच जिल्ह्यातील १० पंचायत समिती गणांमधील २५ जागांवर उमेदवार कायम ठेवण्यात आले असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा महासचिव संतोष सुर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंगळवारी सायंकाळी हॉटेल रसिका येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संतोष सुर्यवंशी म्हणाले की, लातूर महानगरपालिकेप्रमाणे जिल्हा परिषद निवडणुकीतही आघाडी होण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांसोबत उमेदवारी अर्ज परत घेण्याच्या अंतिम वेळेपर्यंत प्रयत्न करण्यात आले. मात्र, जिथे काँग्रेस जिथे स्वतः निवडून येऊ शकत नाही अश्या जागा वंचित बहुजन आघाडीच्या वाट्याला देत होते जसे कि तंबाळा खरोसा मुरुड, सन्मानजनक तोडगा न निघाल्याने पक्षाने स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला.

ते पुढे म्हणाले की, वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार रिंगणात असून, त्यांच्यासाठी जोरदार प्रचार केला जाणार आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शाळा बंद पाडून शाळांच्या जागा स्वतःच्या संस्थेच्या घश्यात घालून त्यांच्या जागा बळकावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना पायबंद घालण्यात येईल.

सामान्यांच्या मुलांना दर्जेदार व विनामूल्य शिक्षण, शेतकऱ्यांना खते व बियाणे मोफय बांधावर पुरवले जाईल, घरकुल योजनेसाठी ५,००००० लाख निधी, विहीर खोदण्यासाठी शेतकऱ्याच्या खात्यावर अधिक अनुदान, तसेच शेतमजुरांना शेतीकाम नसलेल्या काळात शासकीय अनुदान व रोजगाराच्या संधी देण्यासाठी ठोस धोरण राबविले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.तसेच काँग्रेस राष्ट्रवादी यांनी वंचित बहुजन आघाडीचे नाव व श्रद्धेय प्रकाशजी तथा बाळासाहेब आंबेडकर साहेबांचे नाव युती होण्याच्या अगोदर वापरण्याच्या प्रयत्न करून स्वतःचा कमकुवतपना दाखवून दिला आहे त्यांनी पक्ष्याचे नाव व फोटो कुठेही वापरू नये आमचा कुठंच काँग्रेसला पाठिंबा नाही लोकांमध्ये संभ्रम निर्माण करू नये वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार चांगल्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास व्यक्त करत मतदारांनी वंचितच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन संतोष सुर्यवंशी यांनी केले.या पत्रकार परिषदेला वंचित बहुजन आघाडीचे लातूर जिल्हा निरीक्षक सिद्धोधन सावंत, जिल्हा महासचिव अॅड. रोहित सोमवंशी, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा मंजूषा निंबाळकर, शहर महासचिव आकाश इंगळे, युवा जिल्हाध्यक्ष गायकवाड, डॉ. विजय अजनीकर, डॉ. हिरालाल निंबाळकर, प्रा. प्रशांत उघाडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या इंडिया गेट प्रतिकृतीने वेधले लक्ष

लातूर : भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या सामाजिक शास्त्र विभागाच्या वतीने साकारण्यात आलेल्या इंडिया गेटच्या सुंदर प्रतिकृतीने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले.

लातूरच्या शैक्षणिक क्षेत्रात आपल्या अभिनव उपक्रमांनी स्वतंत्र अस्तित्व निर्माण केलेल्या श्रीकिशन सोमाणी विद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांचे शिस्तबद्ध पथ संचलन , मानवी मनोरे, इयत्ता दहावीचा विद्यार्थी अनुराग सावंत याची योगा प्रात्यक्षिके, विद्यार्थ्यांची साहित्य कवायत, सामूहिक कवायत, देशभक्तीपर गीते अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. यावेळी संस्थेचे सदस्य तथा ज्येष्ठ उद्योजक दिलीप माने यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ अतुल देऊळगावकर, डॉ. रमेश जाजू, रामप्रसाद राठी, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

# ग्रामीण विधानसभा मतदारसंघात भाजपाचे सर्वच सक्षम उमेदवार बहुमताने विजयी होणार

## रेणापूरसह लातूर पंचायत समिती भाजपच्या ताब्यात येणार :आ. रमेशआप्पा कराड

लातूर दि. २७ - लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी भाजपाच्या वतीने सर्वच सक्षम उमेदवार देण्यात आले असून मतदार संघात केलेल्या विविध विकास कामाच्या आधारावर निश्चितपणे भाजपाचे उमेदवार बहुमताने विजयी होणार त्याचबरोबर रेणापूरसह लातूर पंचायत समिती भाजपाच्या ताब्यात येणार असल्याचा आत्मविश्वास भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केला.



ग्रामीण भागाच्या विकासासाठी मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून या निवडणुकीकरिता लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीच्या वतीने सर्वच जागेवर सक्षम आणि प्रभावी उमेदवार देण्यात आले असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी २७ जानेवारी मंगळवार रोजी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी अधिकृत उमेदवाराची यादी जाहीर केली आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे अधिकृत उमेदवार काटगाव जिप गट सौ. पूर्वादेवी नाथसिंह देशमुख, काटगाव पस गण सौ. शितल दत्ता लटपटे, गातेगाव पंस गण समाधान जगन्नाथ पवार, मुरुड जिप गट सौ. रंजना बळीराम हिंगले, मुरुड १ पंस गण उद्धव सूर्यभान चव्हाण, मुरुड २ पंस गण सौ. मनिषा सचिन देवकर, एकुर्गा जिप गट साहेबराव ज्ञानोबा मुळे, एकुर्गा पंस गण सौ. स्वाती किशोर घुटे, अंकुली पंस गण संजय श्रीमंत सूर्यवंशी, तांदूळजा जिप गट दिपक भागवत वांगसकर, तांदूळजा पंस गण सौ. सुचिता अंकुश गणगे, गाधवड पंस गण बाबासाहेब साहेबराव भिसे, निवळी जिप गट कु. मयुरी श्रीराम आदमाने, निवळी पंस गण सूर्यकांत भिवा सोनवणे, चिंचोली (ब) पंस गण सौ. रेखा श्रीकांत देशमाने, भातांगळी जिप गट महादेव गुलाब साळुंके, भातांगळी पंस गण पांडुरंग अशोक बालवाड, बोरी पंस गण सिंदूबाई राजेंद्र खुरदळे, पानगाव जिप गट सतीश रावसाहेब आंबेकर, पानगाव पंस गण रंजना मारुती गालफाडे, कोष्टगाव पंस गण सौ. जयश्री संजय डोंगरे, कामखेडा जिप गट सौ. सरितताई शंकरराव भिसे, कामखेडा पंस गण शरद माणिकराव दरेकर, मोटेगाव पंस गण संतोष मुरलीधर चव्हाण, खरोळा जिप गट शिवकन्या महेंद्र गोडभरले, खरोळा पंस गण सौ. शितल प्रताप राऊतराव, कारेपूर पंस गण अंजली राजेश काळे, पोहरेगाव जिप गट सौ. मनिषा दशरथ सरवदे, पोहरेगाव पंस गण आकाश राजेंद्र भुतके, निवाडा पंस गण विष्णू सोपानराव गोरे, भादा जिप गट सौ. छाया पदमाकर चिंचोलकर, भादा पंस गण बळीराम काकासाहेब साळुंके, बोरफळ पंस गण भाग्यश्री कृष्णा साळुंके यांचा समावेश आहे.

लातूर ग्रामीण मतदार संघातील अनेक गावे इतर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मतदार संघात समाविष्ट असून त्यातील भाजपाचे उमेदवार महाराणाप्रताप नगर जिप गट सोमनाथ विठ्ठल वाघमारे, महाराणाप्रताप नगर पंस गण सौ. रेशमा अतुल होळकर, बाभळगाव पंस गण सौ. रजनीगंधा संजय अडसूळ, हरंगुळ (बु) जिप गट सौ. सरिता रवींद्र काळदाते, हरंगुळ (बु) पंस गण प्रशांत नागनाथ खोबरे, हरंगुळ (खु) पंस गण किरण सुरेश रोंगे, आर्वी जिप गट वैशाली चंद्रकांत लोंढे, आर्वी पंस गण सौ. विजया उदय गोजमगुंडे, महापूर पंस गण माणिक निवृत्ती आलुरे, पाखरसांगवी जीप गट सौ. अश्विनी बाबू खंदाडे, पाखरसांगवी पंस गण उमेश सिद्धेश्वर हंडरगुळे, गंगापूर पंस गण सौ. तनुजा धीरज पाटील, शिवली पंस गण सौ. प्रणिता राजकिरण साठे, तुंगी पंस गण परमेश्वर श्रीमंत लांडगे याप्रमाणे उमेदवारी देण्यात आली आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात वाडीवस्तीत केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून लाखो नव्हे तर कोट्यावधी रुपयाचा निधी उपलब्ध करून विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेचे भाजपाच्या पाठीशी मोठे समर्थन असल्याचे सांगून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, आजपर्यंत झालेल्या विविध विकास कामाच्या आधारावर आणि भविष्यात करावयाच्या कामाच्या नियोजनामुळे ग्रामीण मतदारसंघातील जिल्हा परिषदेचे भाजपाचे उमेदवार बहुमताने विजयी होणार असून रेणापूरसह लातूर पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही असे बोलून दाखविले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जिद्दीने जोमाने काम करून भाजपाचे उमेदवार प्रचंड बहुमताने विजयी व्हावेत यासाठी प्रभावीपणे प्रचार यंत्रणा राबवावी. केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून झालेल्या विकास कामांची जाणीव मतदारांना करून द्यावी असेही आव्हान आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

# विस्तारसेवा कार्य समिती अंतर्गत प्रजासत्ताक दिनानिमित्त भारतमाता व संविधान ग्रंथ पूजन उत्साहात संपन्न



लातूर, : येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाच्या विस्तारसेवा कार्य समिती अंतर्गत दि. २६ जानेवारी २०२६ वार सोमवार रोजी लातूर शहरातील प्रमुख चार चौकात भारत मातेच्या प्रतिमेचे व संविधान ग्रंथाचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी साई मंदिर चौकात भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका इंदू ठाकूर, विशाल नगर परिसरातील नगरसेविका कांचनताई अजनीकर, कार्यक्रम प्रमुख लता कुलकर्णी तसेच आठवी ते दहावी विभागातील सर्व महिला शिक्षिका यांनी भारत मातेच्या प्रतिमेचे व संविधानाचे पूजन केले.

शिवाजी चौक येथे विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी, समाजसेवक शहाजी गणपतराव शिंदे, माता पालक, माजी विद्यार्थी, विस्तारसेवा कार्य समिती प्रमुख आदिनाथ कदम, कार्यक्रम प्रमुख प्रल्हाद माले, आठवी ते दहावी विभागातील शिक्षक कर्मचारी व परिसरातील नागरिक यांनी भारत माता व संविधानाचे पूजन केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात भारतीय संविधान, भारतमाता प्रतिमेचे पूजन करण्यासाठी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे विद्यासभा संयोजक तथा विद्यालयाचे उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राम जोशी, आर्वी येथील प्रतिष्ठित नागरिक तथा पालक, कार्यक्रम प्रमुख शैलेश सुपलकर, विस्तारसेवा कार्य समिती सहप्रमुख महादेव गोंदरकर, पाचवी ते सातवी विभागातील शिक्षक कर्मचारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

अंबाहनुमान मंदिर येथे पूजन करण्यासाठी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, अंजली निमर्ळे, कार्यक्रम प्रमुख मेघा सूर्यवंशी, अंबा हनुमान मंदिराचे प्रमुख प्रकाश द्विवेदी, पालक, मंदिर परिसरातील उपस्थित नागरिक, पाचवी ते सातवी विभागातील सर्व महिला शिक्षिका यांची उपस्थिती होती. याप्रसंगी संविधानाचे महत्त्व विशद करण्यात आले.

विस्तारसेवा समिती अंतर्गत संपन्न झालेल्या या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निमर्ळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी, विस्तारसेवा कार्य समिती संस्था प्रमुख जितेंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील विस्तारसेवा कार्य समिती प्रमुख आदिनाथ कदम व सहप्रमुख महादेव गोंदरकर यांनी परिश्रम घेतले.